महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग दोन

सोमवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ / फाल्गुन २, १९४३ (शके)

१२. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित ३१ लक्षवेधी सूचनांपैकी १५ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी पत्रक भाग दोन व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण १६ प्रलंबित निवेदनांपैकी ६ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२२

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना क्रमांक-६९१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे. :-

"भद्रावती (जि.चंद्रपूर) लगतच्या केपीसीएल कंपनीला केवळ २०० एकर जमीनीचा ताबा दिला असताना गेल्या कांही वर्षापासून तब्बल ०३ हजार २०० एकरवर अवैध उत्खनन सुरु असणे, या कंपनीच्या उत्खननामुळे सात गावातील नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, या बेकायदेशीर उत्खननाला जिल्हा प्रशासनाचे सहकार्य असल्याचा आरोप गावकऱ्यांनी करणे, औद्योगिक सारा या कंपनीला भरणे अनिवार्य असताना शेकडो कोटींची करचोरी करणे व भद्रावती शहरालगत कांही वर्षापूर्वी कर्नाटक एम्टा या कंपनीच्या माध्यमातून कोळश्याचे उत्खनन करण्यात येणे, मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर कोळसा ब्लॉक रद्द करण्यात येणे, त्यावेळी सुध्दा कंपनीच्या ताब्यात केवळ २०० एकर जमीन असताना जवळपास ३००० एकर जमिनीवर उत्खनन होणे, ५ ते ६ वर्षानंतर पुन्हा केपीसीएल कंपनीने हा कोळसा ब्लॉक उत्खननासाठी घेणे व बेकायदेशिरपणे उत्खनन करणे, केपीसीएल ने जमिनी अधिग्रहीत केल्या नसल्या तरीही सातबारावर नियमबाह्यरित्या नाव असल्याने जमिनीचे कोणतेही व्यवहार करता येत नसणे, जमीन विकता येत नसल्यामुळे बरांज येथील एक चिमुकली रुग्णालयात भरती असताना पैश्याअभावी दगावणे, शासनाचे या प्रकाराकडे अक्षम्य दुर्लक्ष, ग्रामस्थांमध्ये पसरलेला तिव्र असंतोष, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग व खनिकर्म) यांचे निवेदन

बरांज १ ते ४, किलोनी, मानोरा डिप कोल ब्लॉक्स, मौजा चिचोर्डी, बरांज मोकासा, चक बरांज, केसुर्ली, कढोली, घेनथाळा आणि सोमनाळा, ता.भद्रावती, जि.चंद्रपूर येथील १३७९.५० हे.आर. इतक्या क्षेत्रावर "कोळसा" या खनिज विकसनाकरिता, मे.कर्नाटका एम्टा कोल माईन्स, नागपूर या कंपनीला केंद्र शासनाने क्षेत्र वाटप केल्यानंतर, राज्य शासनाने खाण व खनिज (विकसन व विनियमन) अधिनियम,१९५७ च्या कलम १० (३) नुसार दिनांक १२/०९/२००६ च्या आदेशान्वये, खाणपट्टा मंजूर केला होता. त्यानुसार कंपनीने उपरोक्त क्षेत्रापैकी १०७४.५४ हे.आर. इतके क्षेत्र संपादित केले असून, या संपादित क्षेत्रापैकी, मौजा बरांज मोकासा, चक बरांज येथील १५९.०० हेक्टर क्षेत्रात, शासनाच्या सर्व परवानग्या घेतल्यानंतर, कंपनीने सन २००७ पासून कोळसा उत्खनन सुरु केले होते. परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २४/०९/२०१४ च्या आदेशानुसार, इतर कॅप्टीव कोल ब्लॉकप्रमाणे याही ब्लॉकचे आवंटन रद्द करण्यात आले होते.

तद्नंतर, The Coal Mines (Special Provisions) Act, 2015 नुसार, भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने, उपरोक्त क्षेत्र दिनांक ३१/०३/२०१५ च्या आदेशान्वये मे.कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि. या कंपनीला आवंटित केले. तद्नंतर राज्य शासनाने याआधारे नव्याने, दिनांक १६/०७/२०१५ चे आदेशान्वये दिनांक ०७/११/२०१५ ते ०६/११/२०४५ या कालावधीसाठी या कंपनीला खनिपट्टा मंजूर केलेला आहे. याआधारे, या कंपनीकडून तसेच प्रशासनाकडून पुढील आवश्यक कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर, मे.कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि. या कंपनीने, प्रत्यक्षात दिनांक २६/०३/२०२१ पासून, त्यांनी यापूर्वी संपादित केलेल्या १०७४.५४ हे.आर. क्षेत्रापैकी १५९.०० हे.आर. इतक्या क्षेत्रावर कोळसा उत्पादनास सुरुवात केलेली असून, माहे नोव्हेंबर,२०२१ अखेर सुमारे ८,१०,१८५ मे.टन उत्पादन केले आहे व त्यापोटी या कंपनीने सुमारे रु.१६.५० कोटी अधिकार शुल्क, रु.१.४५ कोटी डीएमएफ व रु.०.२६ कोटी NMET पोटी निधी जमा केलेला आहे.

याशिवाय महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार, प्रत्यक्ष खाणकाम सुरु असलेल्या क्षेत्राकरिता असलेल्या अकृषिक साऱ्यापोटी कंपनीकडून सन २०२०-२०२१ अखेरची रक्कम रु.१,१२,७६,७१४/- वसूल करण्यात आलेली आहे.

याचदरम्यान, केंद्र शासनाच्या दिनांक ०५/०८/२०१५ च्या अधिसूचनेनुसार, खाणपट्टाधारक, त्यांच्या सोयीनुसार तांत्रीक कौशल्य असलेल्या बाह्यस्थ यंत्रणेस Mine Developer and Operator म्हणून नियुक्त करु शकत असल्याने, मे.केपीसीएल कंपनीने "एम्टा" या कंपनीची त्याप्रमाणे नियुक्ती केलेली आहे.

सदर कंपनी पोलीस प्रशासनाचा धाक दाखवून कोळसा उत्खनन करीत असल्याची, केपीसीएल कंपनीचे अनाधिकाराने शेतकऱ्यांच्या सातबारा सदरी नाव नोंद केल्याची, चिमुकली रुग्णालयात भरती असताना जमिनी विकण्यासाठी गेलेल्या वडिलांना माघारी फिरावे लागले अशा प्रकारच्या घटनेसंदर्भात, कोणतीही तक्रार/निवेदन अथवा अशी कोणतीही बाब स्थानिक प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

सदर खाणकाम क्षेत्राचे केंद्र शासनाच्या खाण सुरक्षा निदेशालयामार्फत वेळोवेळी निरिक्षण करण्यात येत असून, यावेळी सदर खनिपट्टाधारकाने मंजूर खाणक्षेत्राबाहेर खाणकाम करित असल्याबाबत, संबंधीत यंत्रणेकडून कोणताही अहवाल प्रशासनास प्राप्त झालेला नाही.

प्रकल्पग्रस्त शेतकरी व कामगार यांच्या मुलांना योग्य शिक्षण व आरोग्याच्या सोयीसुविधा मिळवून देण्याकरिता जिल्हा प्रशासनाकडून डीएमएफ फंड आणि प्रधानमंत्री खनिज कल्याण क्षेत्र योजनेअंतर्गत कार्यवाही सुरु आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र.६३२
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

मा.श्री. अबु आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६३२ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यात गेल्या सात महिन्यात हॅकर टोळ्यांनी राज्यभरातील ४८ हजार फेसबुक युजर्सची खाती हॅक करून त्याचा गैरवापर केल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, ज्यांची खाती हॅक झाली त्यात पोलीस दलातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा देखील समावेश असल्याचे निदर्शनास येणे, सदर विषयी संबंधितांवर करण्यात आलेली वा येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (गृह) यांचे निवेदन

माहे जानेवारी २०२१ ते माहे सप्टेंबर २०२१ या कालावधीत राज्यात एका फेसबुक वापरकर्त्याचे खाते हॅक झाल्याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत फेसबुक खाते हे उपविभागीय पोलीस अधिकारी, दहीवडी विभाग, दहीवडी, जि.सातारा या पदावरील व्यक्तिचे असून ते खाजगी फेसबुक खाते आहे.

सदर प्रकरणी ५ आरोपितांविरूध्द भा.दं.वि. मधील कलम ४२०, ४६८, ३४ सह आयटी ॲक्ट मधील कलम ४३(अ), सह ६६, ६६(सी) अन्वये वडुज पोलीस ठाणे, जि.सातारा येथे दि.२४.०८.२०२१ रोजी गु.र.क्र.३२२/२०२१ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामधील ५ आरोपितापैकी एका आरोपितास अटक करण्यात आली असून सदर आरोपी सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत आहे. सदर आरोपिताविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर गुन्हयामधील उर्वरित ४ आरोपितांचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

.....

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.नानाभाऊ पटोले, जितेश अंतापुरकर, अबू आजमी वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना :-

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ८७ ड्रग इन्सपेक्टरच्या पदासाठी नुकतीच जाहीरात प्रसिध्द करण्यात येणे, परंतु त्यामध्ये ३ वर्षे अनुभवाची अट घालण्यात आली असल्यामुळे या पदासाठी अर्ज करून परिक्षा देणाऱ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होणे, दिल्ली, हिमाचल प्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, सिक्कीम इत्यादी अनेक राज्यांनी त्यांची अनुभवाची अट शिथिल केलेली असल्याचे आढळून येणे, तसेच या धर्तीवर संघ लोकसेवा आयोग (UPSC) यांनी सुध्दा तीन वर्षे अनुभवाची अट काढून टाकलेली असणे, या शिवाय लखनऊ व दिल्ली येथील उच्च न्यायालयाने सुध्दा याबाबत निकाल देऊन अनुभव लागत नसल्याचे सांगण्यात येणे, आज राज्यात ४०० पेक्षा जास्त फार्मसी कॉलेजेस असणे, त्यामध्ये दरवर्षी २४ हजारापेक्षा जास्त विद्यार्थी फार्मा डी आणि पोस्ट ग्रॅज्युएट मिळून ३० हजार विद्यार्थी उत्तीर्ण होत असणे, इतर राज्यात सदरील अट रद्द असताना राज्यात सदरील अट लागू केल्याने मोठ्या प्रमाणात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नोकरीचा प्रश्न निर्माण होत असल्याने राज्यातील मोठ्या प्रमाणात बेरोजगारी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे ह्या विद्यार्थ्यांनी राज्य-शासनाकडे या पदासाठीची अनुभवाची अट काढून टाकावी म्हणून आग्रहाची मागणी वारंवार करण्यात येणे, परंतु यासंदर्भात निर्णय घेण्यास शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी या विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन ३ वर्षे अनुभवाची असलेली अट काढून टाकण्याबाबत व महाराष्ट्र लोकसेवा आयोग जाहीरात क्रमांक २५५/२०११ दि.१७ नोव्हेंबर, २०११ रोजी रद्द करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

डॉ.राजेंद्र शिंगणे, मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन यांचे निवेदन

केंद्र शासनाचा औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० त्या अंतर्गत केंद्र शासनाने प्रसिध्द केलेले औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मध्ये केंद्र शासनाने विहित केलेल्या तरतुदीनुसार राज्य शासनातील आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या अखत्यारीतील सह आयुक्त (औषधे), सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक पदाचे एकत्रित सेवाप्रवेश नियम दि. २७.०९.२००२ च्या अधिसुचेनन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमात औषध निरीक्षक पदाच्या भरतीसाठी औषध व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मध्ये नियम ४९ मध्ये नमुद केल्यानुसार अनुभवाची अट विनिर्दिष्ट करण्यात आलेली आहे. सदर सेवाप्रेश नियमानुसार औषध निरीक्षक पदाच्या सन २००७, २०१५ व २०१६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरीतीच्या अनुषंगाने सदर पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक संवर्गात असलेल्या रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन, सन २००२ च्या सेवाप्रवेश नियमानुसार औषध निरीक्षक संवर्गातील ८७ पदांचे मागणीपत्र

दि. २९.०९.२०२१ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आलेले आहे. सदर मागणीपत्राच्या अनुषंगाने आयोगाने दि. १७.११.२०२१ रोजी सदर पदाची जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. सदर जाहिरातीच्या नमुद अनुभवाच्या अटीबाबत विविध संघटनांनी निवेदने राज्य शासनास सादर केलेली आहेत. सदर निवेदनात नमुद बाबीं विचारात घेऊन, औषध निरीक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमात असलेली अनुभवाची अट वगळण्याची बाब राज्य शासन स्तरावर विचाराधीन असल्याने, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षक पदाच्या भरतीसाठी दि.१७.११.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस स्थगिती देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला. त्यानुसार सदर जाहिरातीस स्थगिती देण्याची विनंती महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दि. ०६.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली होती. त्यास अनुसरून आयोगाने दि. ११.१२.२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर जाहिरातीस स्थगिती दिलेली आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील औषध निरीक्षक पदासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत नमुद अनुभवाच्या मुद्याच्या अनुषंगाने काही उमेदवारांनी मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणात मुळ अर्ज दाखल केले होते. सदर मुळ अर्जाच्या अनुषंगाने मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि. १८.०२.२०२० रोजी दिलेल्या आदेशातील बाबी तसेच,मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या उक्त आदेशाविरूध्द मा. दिल्ली उच्च न्यायालयाने तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन, औषध निरीक्षक पदाच्या सेवापप्रवेश नियमात असलेली अनुभवाची अट वगळण्याबाबत विधा व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेण्यात आलेले आहेत.

विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने इतर राज्यातील औषध निरीक्षक पदाच्या भरती प्रकियेबाबतचा अभ्यास करून, औषध निरीक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमात असलेली अनुभवाची अट वगळण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने औषध निरीक्षक पदाच्या सेवाप्रेश नियमात असलेली अनुभवाची अट वगळुन सुधारित सेवाप्रवेश नियमास मान्यता देण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागाला करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर विहित तरतुदींचे पालन करून, औषध निरीक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियामात विनिर्दिष्ट असलेली अनुभवाची अट वगळुन सदर पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

******

लक्षवेधी सूचना

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुभाष देशमुख, राजेश पवार, राम कदम, राणाजगजीतसिंह पाटील, अमित साटम, सुनील राणे, किशोर पाटील, संजय रायमुलकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. उदयसिंग राजपुत, प्रकाश फातर्पेकर, संजय गायकवाड, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. मिहीर कोटेचा, किसन कथोरे, गणपत गायकवाड, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. संजय केळकर, प्रशांत ठाकूर, कुमार आयलानी, श्रीमती श्वेता महाले, डॉ. विनय कोरे, श्री. चंद्रकांत (निंबा) पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. अबु आजमी, विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, राहूल कुल, जयकुमार गोरे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. प्रमोद पाटील, मोहन मते, लक्ष्मण जगताप, नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-

"म्हाडाची दिनांक १२ डिसेंबर, २०२१ रोजी आयोजित केलेली परिक्षा ही पेपर फुटल्यामुळे ऐनवेळी रद्द करण्यात येणे, यासंबंधीचे ट्वीट खुद्द गृहनिर्माण मंत्र्यांनी रात्री दीड वाजता करणे, विद्यार्थी परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर पोहोचल्यावरच त्यांना परीक्षा रद्द झाल्याचे माहित होणे, परीक्षा ऐनवेळी रद्द केल्यामुळे परीक्षेला बसलेल्या सुमारे पावणेतीन लाख विद्यार्थ्यांना मनस्ताप सोसावा लागणे, सदर परीक्षेचे काम जी.ए. सॉफ्टवेअर टेक्नोलॉजीज या कंपनीला देण्यात आलेले असणे, मात्र या कंपनीच्या प्रमुख संचालकाचाच पेपर फुटीमध्ये सहभाग असल्याचे आढळून येणे, त्याच्यासह अन्य सहा जणांना पोलिसांनी अटक केलेली असणे, या कंपनीने यापूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा, टीईटी शिष्यवृत्ती परीक्षा, एन.टी.एस., एन.एम.एम.एस. यासारख्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या परीक्षांमध्ये गोंधळ घातल्याचा ठपका ठेवण्यात आलेला असणे, त्यासाठी कंपनीला एकदा ९० लाख तर दुसऱ्या वेळेस २५ लाख रुपये दंड ठोठावून काळ्या यादीत टाकलेले असणे, तथापि कंपनीची विश्वासार्हता न तपासताच कंपनीची निवड करण्यात आल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसणे, एकही परीक्षा व्यवस्थितपणे शासन घेऊ शकत नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) दि.२१/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये ४ कंपन्यांना व दि. ०४/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये १ कंपनी यांना ५ वर्षांकरीता मंत्रालयीन

प्रशासकीय विभाग व त्याच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क पदभरती बाबतची सुधारित परिक्षा पध्दती राबविण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्याच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क पदभरतीबाबतची कार्यवाही शासनाने पॅनेलवर नियुक्त केलेल्या ५ कंपन्यांकडून करणे बंधनकारक राहील असेही सदर शासन निर्णयात नमूद केले आहे. सदर शासन निर्णयातील अनु.क्र. (२) येथे मेसर्स जीए सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी प्रा. लि., चे नांव नमूद करण्यात आले आहे.

म्हाड प्राधिकरण तसेच म्हाडा अधिनस्थ विविध मंडळाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे सरळसेवा भरतीने भरण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांनी दि.२१/०१/२०२१ व दि.०४/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या OMR Vendor ची निवड करण्यासाठी म्हाडाने त्यांच्या दि.१९/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये मुख्य अधिकारी, मुंबई इमारत व दुरूस्ती पुनर्रचना मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय समिती गठित केली.

मुख्य अधिकारी, मुंबई इमारत व दुरूस्ती पुनर्रचना मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांनी निश्चित केलेल्या ५ कंपन्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने प्राधान्यक्रमाने ३ OMR Vendor ची निवड करून अहवाल सादर केला. सदर ३ कंपन्यांपैकी मे. जीए. सॉफ्टवेअर टेक्नालॉजी प्रा. लि. या कंपनीची निवड म्हाडाने केली.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील तांत्रिक व अतांत्रिक १४ संवर्गातील सरळसेवेची ५६५ रिक्त पदे भरण्याकरीता मे. जीए. सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला होता.

दि. १२.१२.२०२१, दि. १५.१२.२०२१, दि. १९.१२.२०२१ व दि. २०.१२.२०२१ अशा चार दिवशी चार टप्प्यात परीक्षा घेण्यात येणार होती. रविवार दि.१२.१२.२०२१ रोजी दोन सत्रांमध्ये परीक्षा होणार होती. सकाळच्या सत्रात होणा-या परीक्षेकरीता ४५५२२ अर्ज प्राप्त झाले होते. दुपारच्या सत्रात होणा-या परीक्षेकरिता ५६९४७ अर्ज प्राप्त झाले होते.

तथापि, शनिवार दि.११.१२.२०२१ रोजी रात्री मे. जीए. सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीचे संचालक डॉ. प्रितेश देशमुख यांनी परिक्षेमधील गोपनीयतेचा भंग केला असल्याबाबत म्हाडाची खात्री झाल्यावर त्याच मध्यरात्री मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे प्रथम खबरी अहवाल दाखल केला.

दि. १२.१२.२०२१ रोजी पहिल्या टप्प्यातील परीक्षा होणार होती. परंतू घडलेल्या घटनेमुळे परीक्षेला बसलेल्या उमेदवारांचे भवितव्य पणास लागू नये, सर्व गुणवंत व लायक उमेदवारांवर अन्याय

होऊ नये याकरीता परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय तात्काळ घेण्यात आला. त्याअनुषंगाने तात्काळ ट्वीट करून तसेच म्हाडा च्या अधिकृत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात आली.

सदर कार्यवाही तात्काळ करण्यात आल्याने दि. १२.१२.२०२१ रोजी बातमी वृत्तवाहिन्यांवर प्रसिध्द झाली व सकाळी ७ वाजल्यापासून परीक्षा रद्द झाल्याची बातमी प्रसारीत झाली. यामुळे सकाळच्या सत्रामध्ये परीक्षा देणा-या ४५५२२ अर्जदारांपैकी बऱ्याच अर्जदारांना परिक्षेच्या नियोजित वेळेपुर्वीच परिक्षा रद्द झाल्याचे कळले.

मे. जीए. सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीच्या संचालकानेच गोपनियतेचा भंग केल्याने उक्त कंपनीला "**कारणे दाखवा नोटीस**" बजावण्यात आली आहे. तसेच सदर कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात येत आहे. म्हाडा सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरीता परीक्षा प्रकीयेची पुढील जबाबदारी टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस या नामांकित कंपनीला सोपविण्यात येत आहे. सदर परीक्षा ऑनलाईन पध्दतीने संपुर्ण पारदर्शकपणे व कोणत्याही उमेदवारांवर अन्याय न होता फक्त गुणवंत व पात्र उमेदवारांना वाजवी संधी मिळून त्यांना न्याय मिळेल या हेतूने घेण्यात येणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवार, दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांनी दि.२१/०१/२०२१ व दि.०४/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील अस्तित्वात असलेल्या ५ कंपन्यांचे पॅनल स्थगित करण्याबाबत तसेच पदभरतीसाठी यापुढे होणाऱ्या परीक्षा MKCL, IBPS, TCS, MKGL यांच्या माध्यमातून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

****

एस-५८९-२.

लक्षवेधी सूचना क्र. २९०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.किसन कथोरे, श्री.गणपत गायकवाड, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.संजय केळकर, श्री.प्रशांत ठाकूर, श्री.कुमार आयलानी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-२९० पुढीलप्रमाणे आहे :-

" ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील मार्च २०१९ ते आजतागायत कोरोना १९ च्या कालावधीमध्ये कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजनाकरिता लाखो रुपयांचा विना निविदा खर्च करण्यात येणे, काही कामांच्या बाबतीमध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे परंतु सदरची कामे हि आपल्याच मर्जीतील ठेकेदाराला देण्याकरिता प्रशासनाने व सत्ताधारी राजकीय पक्षाच्या म्हणण्यानुसार काढलेल्या निविदा उघडण्याच्या वेळी अनेक वेळा निविदा रद्द करुन पुर्ननिविदा काढण्यात येणे, कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने गेल्या पाच वर्षात किती निविदा वेळेत उघडलेल्या नाहीत याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून जोर धरु लागलेली असणे, मर्जीतील ठेकेदाराला निविदा लागल्या नाहीत म्हणून काहीतरी कारण पुढे करुन पुर्ननिविदा काढण्यात येणे, नगरपरिषद हद्दीमध्ये रस्ते, कमानी, लव बदलापूर, ओपन जीम, गार्डनचे सुशोभीकरण इत्यादी कामांच्या निविदा राजकीय प्रतिनिधी व प्रशासन यांच्या संगनमताने उघडून मोठ्या प्रमाणत आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झालेला असणे, नगरपरिषदेच्या विकास कामांकरिता ठेकेदाराने भरलेल्या सुरक्षित डीपोझिट च्या अनेक फाईल्स गहाळ झाल्याचे सांगण्यात येणे, त्यामुळे कुळगाव बदलापूर नगर परिषद हद्दीतील गेल्या पाच वर्षात झालेल्या विकास कामांची व त्याबाबत काढलेल्या निविदा तसेच, कोरोना कोविड १९ च्या कालावधीमध्ये खर्च केलेल्या निधी बाबत श्वेत पत्रिका काढण्याची व त्रयस्त समिती द्वारे चौकशी करण्याची मागणी येथील स्थानिक राजकीय पदाधिकारी व नागरिकांमधून करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कुळगांव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात मार्च, २०१९ ते आजतागायत कोरोना-१९ च्या कालावधीत कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजना करिता एकूण ७० कामे करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ५८ कामे ही निविदामार्फत करण्यात आलेली आहेत. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत अत्यावश्यक बाब म्हणून खालील १२ कामे केली आहेत :-

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने उभारलेल्या गौरी हॉल व जान्हवी हॉल या कोविड-१९ रुग्णालय (DCHC) साठी ऑक्सीजन टँक उभारणे.	१४,००,६६०/-
२	कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने उभारलेल्या गौरी हॉल व जान्हवी हॉल या कोविड १९ रुग्णालयासाठी (DCHC) ऑक्सीजन जनरेशन प्लॅन्ट उभारणे.	१,६५,२०,०००/-
३	कोव्हिड अंतर्गत साहित्य खरेदी करणे (NL Health)	७१,५०,४६४/-
४	RTPCR Lab व्यवस्थापन करणे (Labcarepluse)	६०,६०,१४९/-
५	Rapid antigen Test Kit (lifeline Pharma)	१४,२५,६००/-
६	कोव्हिड अंतर्गत बेड व इतर साहित्य खरेदी करणे (फिनिक्स)	७,३१,१३६/-
७	रुग्णवाहीका खरेदी करणे	१४,०७,२६३/-

वरील कामे अंत्यत तातडीची व गरजेची तसेच कोरोनाबाधित रुग्णांचे जीव वाचविण्यासंबंधी आवश्यक असल्याने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९३ (८) नुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचे मंजुरीनुसार करण्यात आली असून जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या लेखी आदेशान्वये खालील कामासाठी थेट खरेदी करण्यात आली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे :-

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	Tab Feripiravir औषध	४,२३,९८१/-
२	मेडिकल ऑक्सिजन (Modern Gas)	१,२३,८९,२६५/-
३	Remdisivir Inj (सुविधा फार्मा)	४९,०००/-
४	Remdisivir Inj (संग्राम फार्मा)	१,४६,८५०/-
५	Remdisivir Inj (Aatlanta फार्मा)	१,९६,०००/-

नगरपरिषदेमार्फत केल्या जाणाऱ्या विकास कामासाठी सन २०१६ पासून ई-निविदा मागवून कामे केली जातात. नगरपरिषदेने आतापर्यंत केलेल्या कामांना ठेकेदाराचा पुरेसा प्रतिसाद मिळालेला आहे. मात्र काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही निविदांना पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे (कमीत कमी ३ निविदा प्राप्त न झाल्यामुळे) फेरनिविदा काढाव्या लागल्या आहेत. निविदा मंजुरीसाठी कमीत कमी ३ निविदा प्राप्त होणे आवश्यक असते. तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास नव्याने निविदा बोलविण्यात याव्यात अशा सूचना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील स्थायी निर्देश क्र.३६ मध्ये दिलेल्या आहेत. सन २०२१-२२ मध्ये आजतागायत एकूण ५२ निविदा प्रसिध्द करण्यात आल्या असून त्यापैकी ४९ निविदांबाबत निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहेत.

नगरपरिषद हद्दीमधील रस्ते, कमानी, लव्ह बदलापूर, ओपन जिम, गार्डनचे सुशोभिकरण इत्यादी कामांसाठी अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीस अधीन राहून सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने तांत्रिक मंजूरी घेऊन कामे ई-निविदा पध्दतीने करण्यात आलेली आहेत. नगरपरिषदेच्या सक्षम प्राधिकरणाने मंजूरी देऊन करण्यात आलेली कामे ही स्थानिक नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार करण्यात आलेली आहेत. तसेच कामासाठी वापरलेले साहित्य याची दर्जा तपासणी शासकीय प्रयोगशाळेतून करण्यात आलेली असून जी कामे २५ लक्ष पेक्षा जास्त रकमेची आहे त्या कामांचे "त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण " सुध्दा करण्यात आले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

विकास कामांकरीता ठेकेदारांनी भरलेली सुरक्षा अनामत रकमेची नस्ती व सुरक्षा अनामत हे त्या त्या विभागात सुस्थितीत असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

****

जलसंपदा विभाग / सिं.व्य.(धोरण)

सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

सर्वश्री सुरेश वरपुडकर, श्री.विक्रमसिंह सावंत, श्री.ऋतुराज पाटील विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"दिनांक २० डिसेंबर २०२१ रोजी कर्नाटक राज्याच्या अधिवेशनामध्ये कर्नाटक राज्याचे मा. मुख्यमंत्री भाषण करत असताना बेळगाव जिल्हा तर सोडाच, १ इंच कर्नाटकामधील जमीन देण्याचा प्रश्न येत नाही याउलट महाराष्ट्रातील जत दुष्काळी तालुक्यातील ४० गावे कर्नाटक मध्ये येण्यास तयार असतील तर त्यांना पुर्ण सोयी-सुविधा व पाण्याचा प्रश्न कर्नाटक राज्य सोडविण्यास तयार आहे. तसेच जत तालुक्यातील चाळीस गावे कर्नाटक मध्ये समाविष्ट होण्यास जत नागरिकांनी केलेली मागणी. महाराष्ट्रात राज्यातील जत मधील दुष्काळी गावांना तुरची-बबलेश्वर योजनेतून शेतीसाठी पाणी ग्रॅव्हिटी (सायफन) पध्दतीने मिळत असणे, कृष्णा नदीपासून केलेला म्हैसाळ योजनेतून महाराष्ट्राने कर्नाटकाला उन्हाळयात मानवता धर्म पाळून दरवर्षी २ टीएमसी पाणी याप्रमाणे एकूण ६ टीएमसी पाणी दिलेले असणे, जत तालुक्याला पुराचे पाणी पावसाळयात कर्नाटक तुरची-बबलेश्वर योजनेतून पाणी दिल्यास कायमचा दुष्काळ संपणार असणे. महाराष्ट्र व कर्नाटक सरकारचा संयुक्त करार करण्याची नितांत आवश्यकता असताना याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असणे, त्यातच कर्नाटक राज्याच्या विधानसभेत अशाप्रकारे त्यांच्या मा.मुख्यमंत्री महोदयांची भूमिका मांडल्यामुळे राज्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत लवकरात लवकर गांभीर्याने विचार करून जत दुष्काळी ४० गावांचा पाण्याचा प्रश्न तातडीची सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.'

मा. मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प (ताकारी व म्हैसाळ उपसा सिंचन योजना) ह्या दोन मोठ्या उपसा सिंचन प्रकल्पांची कामे जवळजवळ पूर्ण झाली असून या योजना अंशत: कार्यान्वित झालेल्या आहेत. सदर प्रकल्पांद्वारे सांगली जिल्ह्यातील कडेगांव, तासगांव, खानापूर आटपाडी, कवठेमहांकाळ, मिरज व जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

तुरची-बबलेश्वर योजनेतून शेतीसाठी पाणी ग्रॅव्हिटी (सायफन) पध्दतीने मिळत आहे. जत तालुक्याला पुराचे पाणी पावसाळयात कर्नाटक तुरची-बबलेश्वर योजनेतून दिल्यास कायमचा दुष्काळ संपणार आहे.

या उपरोक्त योजनेची प्राथमिक तांत्रिक पडताळणी करणेसाठी टोपोशीटच्या आधारे अभ्यास केला असता खालील बाबी निदर्शनास आल्या. तुबची-बबलेश्वर योजनेच्या तिकोटा येथील वितरण हौद क्र. २ चा तलांक ६७०.०० मी., महाराष्ट्र राज्यातील सीमेवरील धुळकरवाडी येथील तलांक ५८० मी. इतका आहे. तसेच तिकोटा वितरण हौद क्र.२ पासूनचे अंतर अंदाजे १० कि.मी. आहे. जत तालुक्यातील सीमेलगतच्या जवळपास २४ गावांचा सरासरी भू-तलांक ५०० ते ५९० मी. असलेने सदर गावांमधील तलाव भरुन बोर नदीतून पाणी प्रवाहीत करुन व त्यावर को.प.बंधारे बांधल्यास अतिरिक्त २० गावांना पाण्याचा लाभ होऊ शकतो.

याबाबत जलसंपदा विभागामार्फत दि.०५/०३/२०१९ व दि.१३/०५/२०१९ च्या पत्रान्वये कर्नाटक शासनाशी पत्रव्यवहार करणेत आला होता. त्यावर अतिरिक्त मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, कर्नाटक राज्य यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले पत्र दि.०८/१०/२०२० अन्वये तुबची-बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यास पाणी देणे तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या शक्य नसल्याने पर्यायी व्यवस्थेचा विचार करणेबाबत कळविले आहे.

तसेच मा. मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री, जलसंपदा व लाक्षेवि, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या जलसंपदा विभागाच्या अधिका-यां- समवेत सन २०२१ च्या पूरपरिस्थितीत आंतरराज्य समन्वय साधण्यासाठी संयुक्त समितीची बैठक दि. १९/०६/२०२१ रोजी बंगळुरु येथे संपन्न झाली.सदर बैठकीमध्ये तुबची-बबलेश्वर योजनेच्या संकल्पनातील तरतूदीमुळे व पाण्याच्या अनुउपलब्धतेमुळे जत तालुक्यास पाणी देता येणे शक्य नसल्याबाबत पुनश्च: कर्नाटक राज्याकडून सांगण्यात आले. महाराष्ट्राने कर्नाटकाला उन्हाळ्यात मानवता धर्म पाळून दरवर्षी २ टीएमसी पाणी याप्रमाणे एकूण ६.८६५ टीएमसी पाणी दिलेले आहे.कर्नाटक राज्यास सन २०१६ व २०१७ मध्ये सोडलेल्या एकूण ६.८६५ टीएमसी पाण्यापैकी आतापर्यंत केवळ ०.०७८ टीएमसी पाणी महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यासाठी कर्नाटक राज्याने परत केले असून त्यांचेकडून अद्यापि ६.७८७ टीएमसी पाणी मिळणे शिल्लक आहे.

मा. मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री. जलसंपदा व लाक्षेवि, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या जलसंपदा विभागाच्या अधिका-यां समवेत सन २०२१ च्या पूरपरिस्थितीत आंतरराज्य समन्वय साधण्यासाठी संयुक्त समितीची बैठक दि. १९/०६/२०२१ रोजी बंगळुरु येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये हिप्परगी बंधा-याच्या खालील बाजूच्या प्रस्तावित अम्माजेश्वरी (कोट्टलगी) उपसा सिंचन योजनेतून महाराष्ट्र राज्याच्या संयुक्त विद्यमाने जत तालुक्यास पाणी देता येणे शक्य होईल असे कर्नाटक राज्याकडून बैठकीत सांगण्यात आले. या बैठकीत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या अधिका-यांची संयुक्त समिती स्थापन करुन सदर समितीद्वारे ३ महिन्याच्या आत अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जत दुष्काळी ४० गावांचा पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१९/प्रक्र-१३६/१९ज.सं.अ, दि. ११/०८/२०२१ अन्वये वारणा प्रकल्पाच्या मंजूर बिगर सिंचन तरतूदीतील विना वापर ६ अघफू (TMC) पाणी म्हैसाळ योजनेत सिंचनाच्या वापरासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्र.३ मधून तीन टप्प्यांद्वारे ६ टीएमसी पाणी उचलून जत तालुक्यातील ६५ वंचित गावांतील अंदाजे २०,३०० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठीची सविस्तर प्राथमिक सर्वेक्षणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

******

एच-५६४-१अ.